| MHSO200008582010 | **नियमित दिवाणी दावा क्र. १७५/२०१०** |
|---|---|

## निशाण क्र. १८६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. ८(क) शहाजी शिवाजी पवार यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगीसाठी व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादीचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. ८(क) शहाजी शिवाजी पवार हे दि. २८/०९/२०२५ रोजी मयत झाले असून त्यांना प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस आहेत. सदरचा दावा हा जाहीरीकरणासाठी, वाटपासाठी व पृथक कब्जा मिळण्यासाठी असल्यामूळे सदरचे वारसांना दाव्यात समाविष्ट करणे न्यायाच्याकामी आवश्यक व गरजेचे आहे. सबब सदर वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादी यांनी विनंती केली.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा जाहीरीकरणासाठी, वाटपासाठी व पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पृष्टयार्थ वादीने नि.क्र. १८७ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. अभिलेखावर दाखल नि.क्र. १८५ वर दाखल असलेल्या मृत्यूदाखल्यावरुन प्रतिवादी क्र. ८(क) शहाजी शिवाजी पवार हे दि. २८/०९/२०२५ रोजी मयत झाल्याचे निदर्शनास येते. वादीने प्रस्तुतचा अर्ज मुदतीमध्ये दाखल केला आहे. वादीच्या अर्जातील कथन तसेच

दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र. ८(क) यांच्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादीस प्रतिवादी क्र. ८(क) यांचे वारसांना अभिलेखावर घेणेची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो,

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादीने प्रतिवादी क्र. ८(क) यांचे वारस अभिलेखावर घेऊन त्याअनुषंगाने दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत अभिलेखावर सादर करावी.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.05.07 13:18:09 +0530

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – ०७/०५/२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ०७/०५/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ०७/०५/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | ०७/०५/२०२६ |